# विज्ञानातून चांगली उर्जा निर्माण करा - डॉ. किशोर कोल्हे

(09.08.2019 ) विवध वैज्ञानिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम विज्ञान मंडळ करते विद्यार्थ्यानी संशोधनात सहभाग देऊन समाजाचे प्रश्न सोडवावे असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे आदिसभा सदस्य डॉ. किशोर कोल्हे यानी बोदवड महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्घाटना प्रसंगी व्यक्त केले.

संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर प्राचार्य डॉ. आय. डी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी त्याच्या मनोगतात ननो तंत्रज्ञाना बद्दल सखोल मार्गदर्शन केले. तर विज्ञान विद्याशाखा ही देशाचे भविष्य ठरविणारी शाखा असे प्रतिपादन अध्यक्षशीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान मंडळाचे प्रमुख डॉ. अनिल बारी यांनी केले. सूत्रसंचालन साक्षी शालेशा व निकिता बाणाईत या विद्यार्थांनीनी केले. तर आभार डॉ. गीता पाटील यांनी मांडले.

सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. डी. एस. पाटील, विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक व विद्यर्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. आर. टी. मोरे, डॉ. चेतनकुमार शर्मा, श्री. नितेश सावदेकर, श्री. समीर पाटील, श्री.दिपक जोशी, श्री.नामदेव बडगुजर यांनी सहकार्य केले.









